**विशेष लेख क्र.१०२** १८ आषाढ १९२९ शके (सायं. ५.३० वा.)
सोमवार, दि. ९ जुलै २००७

## स्वयंरोजगारातून समृद्धीकडे नेणारे
## अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

**दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या मातंग समाजातील तरुणांना स्वयंरोजगार करता यावा व यातून त्यांनी आपले जीवनमान उंचवावे व त्याबरोबरच या समाजाने मुख्य प्रवाहात सामील व्हावे, यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या महामंडळाच्या योजनांची ही माहिती . .**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंनी तरुणांच्या व कामगारांच्या मनात आपल्या साहित्यातून नवचेतना निर्माण केली. अण्णाभाऊ सार्ठेविषयी मातंग समाजच काय, पण प्रत्येक मराठी माणसाच्या मनात एक आदराचे स्थान आहे. अशा अण्णाभाऊंच्या नावाने महाराष्ट्र शासनाने मातंग समाजातील तरुणांनी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपले आणि समाजाचे जीवनमान उंचवावे, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेता यावे, यासाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची ११ जुलै, १९८५ रोजी स्थापना केली. सुरुवातीला महामंडळाचे भागभांडवल २ कोटी ५० लाख रुपये होते, आज ते ५० कोटी झाले आहे.

### बीज भांडवल योजना

या योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंतच्या गुंतवणूक असलेल्या प्रकल्पास मंजुरी देण्यात येते. या प्रकल्पाकरिता मातंग समाजाच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न ३९ हजार, ३०८ तर शहरी भागात राहणाऱ्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५४ हजार, ४९४ रुपये असलेल्या कुटुंबातील व्यक्तिंना पाच लाखपर्यंत गुंतवणूक असलेल्या वैयक्तिक प्रकल्पास मंजुरी देण्यात येते. यात महामंडळाकडून २० टक्के कर्ज स्वरुपात देण्यात येते. यामध्ये १० हजार इतक्या अनुदानाचा समावेश आहे. प्रकल्पाच्या ५ टक्के वाटा हा संबंधित व्यक्तिंनी उपलब्ध करावयाचा, तर ७५ टक्के भाग बँकेकडून कर्ज देण्यात येते.

### अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना

मातंग समाजातील मुलांना शिक्षण घेण्यासाठी मदत मिळावी या उद्देशाने सन १९९३-९४ मध्ये मुख्यमंत्री निधीतून २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. हा निधी राष्ट्रीयकृत बँकेत कायमस्वरुपी ठेऊन प्रतिवर्षी मिळणाऱ्या व्याजातून अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता १० वी पास विद्यार्थ्याला १००० रुपये, १२ वी नंतर पदवीपर्यंत शिक्षण व प्रशिक्षणासाठी १५०० रुपये, पदवी व पदव्युत्तर शिक्षण तसेच प्रशिक्षणाकरिता २५०० रुपये, अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाकरिता २५०० रुपये याप्रमाणे वार्षिक शिष्यवृत्ती मातंग समाजातील विद्यार्थ्यांना देण्यात येते. या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### ५० टक्के अनुदान योजना

केंद्रसरकारकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून राबविण्यात येणारी ५० टक्के अनुदान योजना महामंडळामार्फत राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत ४० हजार रुपयांपर्यंतच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३९ हजार ३०८ रुपयांपेक्षा जास्त नसावे तसेच शहरी भागातील कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५४ हजार, ४९४ रुपये पर्यंत असावे.

...२/

## प्रशिक्षण योजना

प्रशिक्षण योजनेअंतर्गत मातंग समाजातील ७ वी पास ते १० वी नापास युवक-युवतींना या योजनेअतंर्गत स्वयंरोजगार करता यावा यासाठी संगणक, वाहन चालविण्याचे, वेल्डिंग फिटर, रेडिओ, टि.व्ही दुरुस्ती, सुतारकाम, शिवणकाम इत्यादीं व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण शासनमान्य प्रशिक्षण केंद्रामार्फत देण्यात येते.

प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला प्रशिक्षणानुसार तीन हजार ते तीन हजार पाचशे रुपये देण्यात येतात. याशिवाय ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थीना ३०० रुपये, स्थानिक शहरी भागातील प्रशिक्षणार्थीना रुपये १५०, महानगरपालिका हद्दीतील प्रशिक्षणार्थींना २५० रुपये याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

## मुदत कर्ज योजना

राष्ट्रीय अनुसूचित जाती विकास महामंडळ,नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील महामंडळाकडून राबविणाऱ्या योजनाही अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत राबविण्यात येतात.मुदत कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांस त्याच्या स्वतःच्या गुंतवणूकीच्या आधारावर कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेअंतर्गत अर्जदाराला ३० लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायाला मुदत कर्ज दिले जाते. एक लाख रुपयापर्यंत गुंतवणूक असलेल्या प्रकल्पाकरिता ९० टक्के रक्कम एन.एस.एफ.डी.सी. मार्फत कर्ज रुपात देण्यात येते. यामध्ये महामंडळाचा सहभाग १० टक्के असतो. तसेच १० हजार रुपयांच्या अनुदानाचा समावेश आहे. अर्जदाराला स्वतःकडून कुठलीही गुंतवणूक करावी लागत नाही. एन.एस.एफ.डी.सी. चा व्याज दर ६ टक्के आहे, तर महामंडळाचा व्याज दर ४ टक्के इतका आहे. एक लाख ते अडीच लाखपर्यंत कर्ज रक्कम असेल तर, एनएसएफडीसीची रक्कम हिस्सा ९० टक्के तर ८ टक्के महामंडळाचे १० हजार अनुदानासह असून, अर्जदाराला दोन टक्के इतका हिस्सा भरावा लागतो. व्याज दर अनुक्रमे दोन टक्के आणि चार टक्के आहे. अशाप्रकारे पाच लाख किंवा त्यापेक्षा जास्त ३० लाखापर्यंत कर्ज देण्यात येते. कर्ज परतफेडीची मुदत १० वर्षे किंवा एन.एस.एफ.डी.सी ठरविल त्याप्रमाणे राहते.

## लघु उद्योगासाठी कर्ज

एन.एस.एफ.डी.सी च्या योजनेअंतर्गत अर्जदाराला १५ हजार रुपयापर्यंत मुदत कर्ज देण्यात येते.यामध्ये महामंडळाचे १० हजार रुपये असे एकूण २५ हजारापर्यंत लघु कर्ज देण्यात येते.

## महिला समृद्धी योजना

महिलांचा आर्थिक विकास व्हावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते. यामध्ये प्राधान्याने परित्यक्ता, विधवा अशा निराधार महिलांचा या योजनेअंतर्गत प्राधान्याने विचार केला जातो, यामध्ये २५ हजार एन.एस.एफ.डी.सीकडून तर, १० हजार महामंडळाकडून देण्यात येतात. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ मातंग समाज व त्या अंतर्गत मांग, मांतग, मिनी मादीग, दानखणी मांग, महाशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी या दहा पोटजातीच्या व्यक्तिंना घेता येतो.

अधिक माहितीसाठी महामंडळाचे मुख्य कार्यालय बी-२२, कल्याण केंद्र, अशोकवन, हनुमान टेकडी, बोरीवली (पूर्व) मुंबई-६६ येथे असून, दूरध्वनी क्र.२८९७७२७३ असा आहे.

## विविध व्यवसाय

किराणा दुकान, जनरज स्टोअर्स, ब्युटी पार्लर, रसपान गृह, टेलरिंग फार्म, हार्डवेअर, गॅरेज, खडू निर्मिती, विटनिर्मिती, इलेक्ट्रिक दुकान, शेळयापालन, मत्स्य उत्पादन आदी व्यवसायांसाठी कर्ज घेता येऊ शकेल. अधिक माहितीसाठी मंडळाच्या त्या त्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधता येईल.

**-- विष्णू काकडे**

००००००